# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शामराव मुरगेप्पा नरळे ,<br>मु. पो. सनमडी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शामराव मुरगेप्पा नरळे , मु. पो. सनमडी, ता. जत, जि. सांगली यांनी ५ अश्वशक्ती शेतीपंप वीज पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे चलनाचे रु. ५०००/– पावती क्रमांक ५३२३७३० दि. ३१.१०.२००९ रोजी भरले. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ६.११.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने अर्ज केल्यानंतर दि. १४.१.२०१० रोजीच्या आदेशा प्रमाणे तक्रारदार यांनी दि. २८.१.२०१० रोजी चाचणी अहवाल दिला आहे. अंतर्गत कक्षाने विलंबाबाबत भरपाई द्यावी असे आदेश केले आहेत.

मंचाकडून ग्राहकाची अपेक्षा – त्यांना वितरण वाहिनीचा विस्तार असलेने वीज पुरवठा दि. १३.४.२०१० पर्यंत मिळावा व झालेल्या विलंबापोटी विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. तक्रार प्रतिनिधीमार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १७.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. ३१.१०.२००९ रोजी अनामत रक्कम भरलेली आहे व दिनांक २८.१.२०१० रोजी चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले. परंतु जागेची संयुक्त तपासणी केली असता जागेवर संच मांडणी नव्हती (मोटर व मोटर पेटी). त्यांना लागणारी ०.६ कि.मी.ची लघुदाब वाहिनी तयार असून मोटर व मोटर पेटी बसविल्यानंतर वि.प.च्या नियमानुसार वीज कनेक्शन देण्यात येईल.

प्रस्तुतची तक्रार दि. २८.७.२०१० ला मंचासमोर घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री.खापरे उपस्थित. वितरण कंपनीतर्फे श्री. भोसले कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग, श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता संख उप विभाग, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता उपस्थित. श्री. खापरे यांनी असे प्रतिपादन केले की, ग्राहकाने दि. ३१.१०.२००९ ला अर्ज केल्यानंतर दि. २८.१.२०१० ला चाचणी अहवाल दिला आहे. त्यामुळे दि. २७.४.२०१० पर्यंत वीज जोडणी मिळणे जरुरी होते ती दिली नाही त्यामुळे वीज जोडणी मिळावी व विलंबापोटी भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. या उलट, उत्तरादाखल वि.प.तर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, १० पोलचे काम सँक्शन आहे. सर्व्हेमध्ये १७५ फूट जादा अंतर दाखविण्यात आले आहे, त्यामुळे १ पोल कमी रुन कनेक्शन देण्यात येईल. परंतु संयुक्त तपासणी केली असतां, जागेवर संच मांडणी केलेली नाही असे दिसून आले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार वि.प.कडून भरपाई मिळण्यास हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी दि. ३१.१०.२००९ रोजी शेतीपंपाचे वीज कनेक्शनसाठी प्रोसेसिंग फी भरली आहे. अंतर्गत कक्षाचे आदेशानुसार त्यांनी दि. २८.१.२०१० ला चाचणी अहवाल दिला, त्यामुळे तेथून पुढे ३ महिने म्हणजे दि. २८.४.२०१० पर्यत कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे वीज जोडणी देणे आवश्यक होते. तसे न झाल्याने वि.प.कडून तक्रारदार भरपाई मिळणेस हक्कदार आहेत.

वितरण कंपनीतर्फे सर्व्हे करतांना १७५ फूट अंतर जादा झाल्यामुळे १० पोलच्या सँक्शनची गरज होती, त्यामध्ये विलंब झाला तेव्हा १ पोल कमी करुन कनेक्शन देणे योग्य होईल. एल.टी. एक्स्टेंशन आहे. वि.प.ने संयुक्त तपासणी केली असतां, जागेवर संच मांडणी नव्हती असे प्रतिपादन केले आहे, परंतु संयुक्त तपासणी कधी केली त्याची तक्रारदारास नोटीस दिली होती का ? संयुक्त तपासणी अहवालाची साधी प्रत वि.प.ने मंचासमोर परिशिष्ट अ सोबत अथवा दि. २८.७.२०१० रोजी सुनावणीवेळी दिली नाही. त्यामुळे संयुक्त तपासणीवेळी संच मांडणी नव्हती ही लंगडी सबब आहे असे वाटते. असे असले तरी, वि.प. अशा रिपोर्ट देण्याऱ्याविरुध्द कारवाई करु शकते किंवा संबंधितांकडून इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टरकडे रिपोर्ट करु शकते. असे कांही केल्याचे दिसत नाही. त्यामुळे संच मांडणी बाबत मोघम उत्तर दिल्यामुळे विलंबापोटी भरपाई माफ होणे अयोग्य आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देवून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदार यांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नियमाप्रमाणे वीज जोडणी त्वरीत द्यावी.

३) वि.प.ने तक्रारदार यांस दि. २८.४.२०१० पासून पुढे वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे भरपाई देण्यात यावी.

४) तक्रारदार यांना वीज जोडणी दिल्यानंतर सदर रकमेचे दोन बिलींग सायकलमध्ये समायोजन करण्यात यावे.
सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांनी चाचणी अहवाल दिल्यानंतर व कागदपत्रांची पूर्तता झालेनंतर नियमानुसार त्यांना विद्युत पुरवठा द्यावा.

३) खर्चाबाबत आदेश नाही.



४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष